७/प

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
मंत्रालय (विस्तार), ५वा मजला, दालन क्र. ५५३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र. ०२२-२२०२७०७४ Email_ID: exc2.home@maharashtra.gov.in

---

शासन आदेश क्र. एफएलआर-०५२०/कोव्हिड/प्र.क्र.२/राउशु-२ दि. ११ मे, २०२०.

प्रति,
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई.

**विषय :-लॉकडाऊन मधील कालावधीत घरपोच मद्यविक्री सुरू करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या शासन आदेशाची मराठी व इंग्रजी स्वाक्षांकीत प्रत सोबत पाठवित आहे. सदर शासन आदेश शासन राजपत्र भाग-4 (ब) असाधारण मध्ये प्रसिद्ध करण्यात यावेत, ही विनंती.

आपला,

**( अ. व्यं. जेवळीकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

सहपत्र : निरंक.

**प्रत,**

कार्यासन, राउशु-२ (संग्रहार्थ)

Scanned with CamScanner

47

3/5

***ORDER***

Home Department,
Mantralaya,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032.
Dated the 11th May, 2020.

Maharashtra Prohibition Act.

No.FLR-0520/COVID/C.R.1/EXC-2 - In exercise of the powers conferred by clauses *(f)* and *(n)* of section 139 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949); and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, permits the licensee holding the licenses in Form FL-II, FL/BR-II, FL/W-II, as appended to the Bombay Liquor Rules, 1953, to sell the IMFL- Spirits, Beer, Mild Liquor, Wines, to the permit holders by effecting delivery at the home address of the permit holder, subject to the conditions, specified hereunder:-

**CONDITIONS**

1. The licensee shall sell the IMFL- Spirits, Beer, Mild Liquor, Wines only in respect of the liquor for which he is licensed to sale.

2. The licensee shall effect sale and delivery of the foreign liquor only from within the area of the licensed

Scanned with CamScanner

premises and on the day and during the hour as specified.

3. The sale of liquor under this order to the permit holder by effecting delivery of the permitted liquor to the home address may be effected only if the permit holder places an order for sale of the concerned liquor.

4. The licensee shall ensure that the persons deployed for the delivery of liquor use mask and also use hand-sanitizers at frequent intervals.

5. This order shall be in force and effective until the orders of Lockdown issued by the Government from time to time under the Disaster Management Act, 2005 (Act 53 of 2005) or any other Act are in force in the State.

6. The Government may at any time and at its discretion either modify or rescind the same.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

(Valsa Nair Singh)
Principal Secretary (Excise)
to Government of Maharashtra.

Scanned with CamScanner

९३/प

३७/प

**आदेश**

गृह विभाग,
मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०००३२.
दिनांक — ११ मे, २०२०

**महाराष्ट्र दारूबंदी कायदा**

क्रमांक एफएलआर-०५२०/कोविड/कोव्हीड/प्र.क्र.१/राउशु-२ - महाराष्ट्र दारूबंदी कायदा (१९४९ चा २५ वा) चे कलम १३९ च्या उपकलम (१) चा खंड (एफ) व (एन) नुसार महाराष्ट्र शासनास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अंतर्गत मंजूर केलेल्या अनुज्ञप्ती नमुना एफएल-२, एफएल/बीआर-२, एफएल/डब्लू-२ अनुज्ञप्तीधारक खालील शर्तीच्या अधीन राहून भारतीय बनावटीचे विदेशी मद्य-स्पिरिटस, बीअर, सौम्य मद्य, वाईनची विक्री परवानाधारकास त्याच्या निवासी पत्त्यावर घरपोच देईल.

**शर्ती**

१. जो अनुज्ञप्तीधारक भारतीय बनावटीचे विदेशी मद्य-स्पिरिटस, बीअर, सौम्य मद्य, वाईन या मद्य प्रकाराची विक्री करण्यासाठी अनुज्ञप्ती धारण करतो, केवळ त्या मद्य प्रकाराची विक्री करेल.

२. विहीत केलेल्या दिवशी व वेळेत अनुज्ञप्तीधारक विदेशी मद्याची विक्री व वितरण केवळ त्याच्या अनुज्ञप्ती आवारातून करेल.

३. परवानाधारकाने संबंधित मद्याच्या विक्रीसाठी मागणी नोंदविली तरच, परवानाधारकास अशा मद्याचे वितरण अनुज्ञेय मद्याचे परवानाधारकाच्या निवासी पत्त्यावर करता येईल.

Scanned with CamScanner

४. अशा मद्याची विक्रीकरिता घरपोच सेवा देण्यासाठी ज्या व्यक्तींची नेमणूक केली जाईल, त्या व्यक्ती मास्कचा वापर व वेळोवेळी हाताचे निर्जंतूकीकरण करण्यासाठी हॅन्ड सॅनिटायझरचा वापर करतील याची दक्षता अनुज्ञप्तीधारक घेईल.

५. राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ (२००५ चा ५३ वा कायदा) किंवा राज्यात लागू असलेल्या इतर कायद्यान्वये जारी केलेले लॉकडाऊनचे आदेश अस्तीत्वात असेपर्यंत हे आदेश लागू व अस्तीत्वात राहतील.

६. शासन स्वेच्छेने कधीही सदरचे आदेश सुधारीत किंवा रद्द करू शकेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

वल्सा नायर सिंह

(वल्सा नायर सिंह)
महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिव
(राज्य उत्पादन शुल्क)

Scanned with CamScanner